# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ ९८८५

दिनांक :- 12 JUN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित पदविका /

पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय :** - शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाडीबीटी पोर्टलमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी अर्ज करण्यासाठी व तपासणी करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ...

संदर्भ : - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०१८-१९/२८० दिनांक ११/०६/२०१९.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी याआधी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व संस्थांना अर्जांची ऑनलाईन तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती . तरीही काही विद्यार्थ्यांकडून विहित मुदतीत अर्ज न भरल्याने तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जांची तपासणी संस्था स्तरावर प्रलंबित असल्याने, शासनाकडून अर्ज भरण्याची व प्रलंबित अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्यासाठी **दि. ३०/०६/२०१९** पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अद्याप अर्ज केलेला नाही त्यांनी विहित मुदतीत म्हणजे **दि. ३०/०६/२०१९** पर्यंत संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे व संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी याबाबतची सूचना संस्थेच्या दर्शनी सूचना फलकावर जाहीर करावी व कोणताही पात्र विद्यार्थी लागू असलेल्या संबंधित योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या प्राचार्यांनी स्वतः घ्यावी.

तसेच, संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या अर्जाची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन **दि. ३०/०६/२०१९** पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलबिंत राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहिल तसेच यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबतची नोंद विद्यार्थी/संस्थांनी घ्यावी.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२ या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

D:\DesktopFiles\Institute Letter 2019.docx